# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/०००६८०**

**अपिलार्थी श्री. कैलास तुकाराम जाधव**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**
डोंगरी विभाग, महेश्वरी मार्ग, डोंगरी, मुंबई-०९.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (परिमंडळ-१)**
वालचंद हिराचंद मार्ग, जी.पी.ओ.समोर, मुंबई- ४०० ००१.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ३०.०४.२०२६**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. २४.०४.२०२६ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित(प्रतिनिधी) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २५.१०.२०२४ | २१.११.२०२४ | १६.१२.२०२४ | ०६.०१.२०२५ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १७.०३.२०२५ रोजीच्या अर्जान्वये उशीरा माहिती दिली व दिलेली माहिती अपूर्ण आहे असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २१.११.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ०६.०१.२०२५ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. २५.१०.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार त्यांनी दि. ०४.०६.२०२४ रोजी केलेली तक्रारीवर करण्यात आलेली कार्यवाहीची माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि.२१.११.२०२४ रोजी अपिलार्थींना माहिती उपलब्ध करुन दिली.

३. अपिलार्थींनी विहित वेळेत माहिती दिली नाही असे नमुद करुन दि. १६.१२.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०६.०१.२०२५ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती दिलेली आहे व अपिलार्थींना उशीराने माहिती दिल्याने स्पष्टीकरण मागविण्यात येत आहे असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढण्यात येत आहे.

४. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि, त्यांनी त्यांचे लेखी निवेदन दि.२७.०४.२०२६ आयोगास सादर केले. ते अभिलेखावर घेण्यात आले. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित असून त्यांनी आयोगास सादर केले की, अपिलार्थींना दि. २१.११.२०२४ रोजीच्या पत्रान्वये पोस्टाने माहिती पाठविण्यात आली होती. परंतु त्यांना माहिती न मिळाल्याने जेव्हा ते स्वत: उपस्थित राहिले व दि. ०३.१२.२०२४ रोजी पुन्हा माहितीची प्रत उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

..२/-

५. आयोगाच्या अभिलेखावरील व्दितीय अपील सादर करताना अपिलार्थी यांनी दिलेले निवेदन जन माहिती अधिकारी यांना दाखविल्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, श्री. संदीपान मते, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ई विभाग व संस्थेचे पदाधिकारी तसेच संस्थेच्या सदनिकेत अनधिकृतपणे वास्तव्य करणाऱ्या व्यक्तींचा जबाब घेण्यात आला नव्हता. म्हणून जबाब उपलब्ध करुन देणे शक्य नाही.

६. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केल्याप्रमाणे अपिलार्थींना श्री. संदीपान मते, संस्थेचे पदाधिकारी तसेच सदर संस्थेत राहणारे व्यक्ती यांचे जबाब घेण्यात आले विषयी स्पष्ट वस्तुस्थितीदर्शक उत्तर अपिलार्थींना आदेशप्राप्तीच्या १५ दिवसांत नोंदणीकृत टपालाने निशुल्क उपलब्ध करुन द्यावे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission
Greater Mumbai

Sd/- 30-4-2026

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ३०.०४.२०२६**